जा.कं. / लेखा / 9611 /2024
दिनांक 18/10/2024

**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**

नगर रोड, बीड, फोन : 02442 – 221203, **mahbeedc@mhstate.nic.in**

## निविदा सुचना

बीड मुख्यालयातील जिल्हा व सत्र न्यायालय, बीड, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, बीड व मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड तसेच अंबाजोगाई , माजलगांव व गेवराई हया 04 ठिकाणच्या न्यायालयाचे कार्यालयातील नक्कल विभागाचे नक्कलांचे काम खाजगी कंत्राटीदारामार्फत झेरॉक्स मशीनव्दारे करुन घेणेसाठी खुल्या बाजारपेठेतुन मोहरबंद निविदा / दरपत्रके दिनांक 08/11/2024 रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत सर्व करासहीत मागविण्यात येत आहेत.

निविदाकारांना कार्यालयाच्या गरजेनुसार नक्कल विभागातील नक्कलांचे कामे तात्काळ किंवा विहीत मुदतीत वेळेवर करुन देणे, तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार करुन देणे त्यांचेवर बंधनकारक राहील. तसेच निविदाकार यांनी त्यांची निविदा मंजूर झाल्यावर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार कार्यालयाशी करार करणे, तसेच कार्यालयात बॅक गॅरंटी, झेरॉक्स मशिन संदर्भातील विमा पॉलीशी कार्यालयात सादर करणे त्यांचेवर बंधणकारक राहील.

मोहरबंद निविदा / दरपत्रके दिनांक 08/11/2024 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, बीड या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद / दरपत्रकांचा या प्रकियेत समावेश करण्यात येणार नाही. विहीत मुदतीत प्राप्त मोहरबंद निविदा / दरपत्रके शक्य झाल्यास दिनांक 11/11/2024 रोजी दुपारी 2.00 वाजता उघडण्यात येतील व पडताळणी अंती खरेदी समिति त्याबाबत उचित कार्यवाही करील. सदरील बंद पाकीटावर " **बाहय कंत्राटीदारमार्फत झेरॉक्स मशीनव्दारे सेवा घेणे बाबत** " असे लिहिणे आवश्यक आहे.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवत आहे.

आदेशावरुन,
18/10/2024
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,बीड

**अटी व शर्ती** :–

01} निविदाकारांना मा. उच्च न्यायालय यांनी ठरवुन दिलेल्या सर्व अटी व शर्ती चे पालन करणे बंधणकारक आहे.

02} निविदाकारांनी निविदा / दरपत्रक सादर करतांना त्यावर जी.एस.टी. / एस.जी.एस. टी.कमांक नमुद करणे आवश्यक आहे. जर नसेल तर तत्सम प्राधिकारणाकडील नोंदणी कमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.

03} निविदाकारांनी निविदा / दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक असेल.

04} प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा / दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.

05} खरेदी प्राधिका–या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि ईच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदारांना " हमीपत्र " सादर करावे लागेल.

06} निविदाराकराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी करार रदद करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश बीड यांचा राहील.

07} न्यायालयीन वादविवाद उदभवल्यास कार्यक्षेत्र बीड जिल्हा राहील.